म. स. वाचनालय, ठाणे
विषय
११३९०
IRBK-0111390



प्रभाकर बेंद्रे

अनाथ विद्यार्थी गृह
प्रकाशन. पुणे २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

५१९ ११३९० ४१३११९८७
४१६७८
५३२९

# बापूंची प्रतिमा

## आणि

# इतर गोष्टी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, वाचनालय शाखा.
अनुक्रम ४१६७८ वि.
क्रमांक ३३२९ नोंद दि.

लेखक

श्री. प्रभाकर बेंद्रे

एम्. ए., बी. टी.

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय अंमळनेर.
क्र. ११३९० नों. द.
वि.

IRBK-0111390

किंमत ९० पैसे

अनाथ विद्यार्थी गृह
प्रकाशन, पुणे २

प्रकाशक :

**[illegible]. गं. श्री. कोशे,**

अ. वि. गृह प्रकाशनासाठी,

१७८६ सदाशिव पेठ, पुणे २

• •

© प्रकाशकाधीन

• •

प्रथमावृत्ती

देवदीपावली शके १८८७

दि. २४-११-६५

• •

मुद्रक :

**दि. दा. गांगल, एम्. एस्सी.,**

लोकसंग्रह मुद्रणालय

१७८६ सदाशिव पेठ, पुणे २

# अनुक्रमणिका


| गोष्टीचे नाव | पृष्ठ |
|---|---|
| १ बापूंची प्रतिमा | ५ |
| २ हरवलेली पुस्तके | ९ |
| ३ स्मृती | १४ |
| ४ पश्चात्ताप | १९ |
| ५ माधवची परीक्षा | २२ |
| ६ संगतीचा परिणाम | २४ |
| ७ दिनू खरे बोलू लागला | २८ |
| ८ वर्ग-बंधू | ३० |

गोष्टीची आवड असणारी
माझी मुले

चि. सुरेश व चि. सुधीर

**यांना**

**समर्पण**

# निवेदन

'बापूंची प्रतिमा आणि इतर गोष्टी' ...हे माझे बालकथांचे पुस्तक बाल-वाचकांच्या हाती देताना मला अत्यानंद होत आहे.

गेल्या कित्येक वर्षापासून माझी इच्छा होती की, बाल-वाचकांसाठी, विशेषत: आठ ते अकरा वर्षाच्या आतील बाल-गोपालांसाठी एखादे गोष्टींचे पुस्तक लिहावे, प्रकाशित करावे. परंतु काही ना काही अडचणीमुळे माझी ही इच्छा अपूर्ण राहिली, आज माझी ही इच्छा पूर्ण होत आहे. १९३९ सालापासून मी अशा प्रकारच्या लेखांस सुरुवात केली. मुलांचे मासिक, शालापत्रक, आनंद, विकास, बालसन्मित्र, शिक्षणपत्रिका किशोर, श्याम, इ. बालांसाठी असलेल्या मासिकांतून मी १९३९ ते १९६४ या कालखंडात सातत्याने लेखन केले, व अजूनही माझे लेखन चालू आहे. प्रकाशित झालेल्या कथांपैकी निवडक कथा या पुस्तकात घेतलेल्या आहेत. सर्व कथा स्वतंत्र आहेत. या कथांची निवड करताना, बाल-वाचकांचे वय, त्यांची जिज्ञासू वृत्ती, समजशक्ती, अनुभव, वातावरण, ग्राहकशक्ती व निरागसवृत्ती यांची कल्पना नमेम धरूनच निवड केलेली आहे, लेखन केलेले आहे. या पुस्तकातील कथा मनोरंजनात्मक, तशाच उपदेशपर व शालेय अनुभूतीतील आहेत. मला खात्री आहे व आत्मविश्वासही आहे की, या पुस्तकातील कथा माझ्या बाल-वाचकांना विशेष आवडतील.

हे पुस्तक प्रकाशित करण्याची प्रेरणा अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे, या संस्थेचे एक प्रभावी प्रचारक प्रतिनिधी, श्री. क. द. पुराणिक यांचेपासूनच मला मिळाली. या पुस्तक-प्रकाशन-प्रसंगी त्यांचे आभार मानणे माझे कर्तव्यच आहे.

महाराष्ट्रातील प्रख्यात व लोकप्रिय प्रकाशन-संस्था, 'अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे' या संस्थेमार्फत माझे हे पुस्तक प्रकाशित होत आहे ही गोष्टही मी विशेष महत्त्वाची व भाग्याची मानतो. अ. वि. गृहाचे प्रमुख संचालक; प्रकाशन विभागाचे प्रमुख श्री. डॉ. ग. श्री. खैर, श्री. डॉ. गं. श्री. कोशे व श्री. का. गं. सोनार, ह्यांचाही मी ऋणी आहे. अनाथ विद्यार्थी गृहाचा कामगार-वर्ग, चित्रकार, सजावट कार्यकर्ते या सर्वांचा मी आभारी आहे. त्यांच्याच परिश्रमाने माझे हे छोटेसे पुस्तक अत्यंत सुबक व सुंदर निघाले आहे.

माझ्या बाल-वाचकांनो, तुम्हांला हे पुस्तक आवडो हीच इच्छा.

अमळनेर,
२५ ऑक्टोबर १९६५

—प्रभाकर बेंद्रे

... ग्रंथालय शाखा
क्रमांक ... नोंद दि. ...

# १ : बापूंची प्रतिमा

वसंताला जयंताची संगत लागली मात्र आणि वसंताचा स्वभाव बदलला. वसंत हुषार विद्यार्थी होता. तसाच तो अत्यंत प्रामाणिक व सालस होता. खोटे बोलणे त्याला कधीच माहीत नव्हते. वर्गात नेहमी त्याचाच पहिला क्रमांक असे. शालेय जीवनातील कोणत्याही कार्यात त्याचा पुढाकार असे. वादविवाद सभा, मासिक, नाटचप्रसंग व इतर सर्व शालेय कार्यक्रमांत तोच पुढे असे. तो सर्वांशी प्रेमळपणे, मनमिळाऊ-पणाने व गुण्यागोविंदाने राहात असे. कधीही कोणाशी भांडत नसे. सर्व विद्यार्थ्यांवर त्याचे प्रेम होते. सर्वांशी त्याची वागणूक सारखीच होती. हा गरीब, हा श्रीमंत, हा चांगला, हा वाईट, हा फरक त्याच्याजवळ अजिबात नव्हता आणि म्हणूनच तो सर्वांचा आवडता झालेला होता. सर्व शिक्षकांचे त्याच्यावर प्रेम होते. एक आदर्श विद्यार्थी म्हणून शाळेत त्याची ख्याती होती. विद्यार्थी कसा असावा हे सांगताना शिक्षक वसंता-कडे बोट दाखवीत असत व त्याची स्तुती करीत असत.

आपला मुलगा इतका हुषार, सालस व प्रेमळ निघाला म्हणून वसंताच्या वडिलांना–दादासाहेबांनाही खूप अभिमान वाटे. घरकामातही वसंता हुषार होता. नुसती पुस्तकी विद्याच त्याला अवगत होती असे नव्हे तर व्यवहारातही तो चलाख होता. घरचे कोणतेही काम तो मोठ्या आवडीने व नीटनेटकेपणाने करी. आईचा अथवा दादांचा त्याने केव्हाही अपमान केला नाही. सांगितलेले काम तो चटकन करी. धाकट्या बहि-णीशी–मालूशीही–त्याची वागणूक चांगलीच होती. तिच्या कामात व अभ्यासात तो मनापासून मदत करी. एक आदर्श मुलगा म्हणून वसंताची ख्याती झालेली होती. पण—

जयंत कोरान्ने त्याच्या वर्गात आला व वसंताचा स्वभाव बदलला. जयंत हा श्रीमंत रावबहाद्दुरांचा एकुलता एक मुलगा होता. स्वभावाने

तो फारच दुष्ट, खोडकर, मतलबी व खुनशी होता. वर्गात एकट्या वसंताशिवाय त्याचे कुणाशीही पटेना. तो रोज कुणाशीतरी भांडण उकरून काढी व भांडत बसे. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना तो खूप टाकून बोले; मारीतही असे. वर्गात त्याचे कुणाशीच पटत नसे. सर्वांशी भांडण ! त्याचा अभ्यासही बेताचाच. वसंताच्याच शेजारी तो बसत असे. वसंताला त्याची संगत लागली. वाईट संगत होती ती. संगत वाढत जाऊ लागली. जयंताच्या गोड बोलण्याला व श्रीमंतीला वसंता बळी पडला. वसंताच्या स्वभावात फरक पडू लागला. अभ्यासातून त्याचे लक्ष उडाले. वर्गात त्याचीही हळूहळू अनेकांशी भांडणे होऊ लागली शिक्षकांच्या नजरेतूनही तो उतरू लागला. घरचे कामही तो करीनासा झाला. वहिणीशी भांडू लागला. वर्गातील मुलांशी त्याचे भांडण होऊ लागले. शिक्षकांना त्याच्यात झालेले हे परिवर्तन दिसून आले. वर्गशिक्षक त्याला म्हणाले देखील– " वसंता, तुला कुणाची तरी वाईट संगत लागली वरं, लक्षात ठेव ; संगतीचा परिणाम वाईट होतो. सावध रहा. " वडील देखील त्याला म्हणाले, " वसंता, अलीकडे तुझा स्वभाव असा का बदलला ? " मित्रांनी देखील त्याला खूप सांगितले; पण तो कुणाचेच ऐकेना आणि एके दिवशी—

वसंता जयंताच्या श्रीमंतीला व गोड बोलण्याला भुलला. पैशामुळे मोहित झाला. जयंत एक दिवस त्याला सहज म्हणाला, " वसंता, कसंही करून एक रुपया उद्या आण. आपण मजा करू. मात्र आईजवळ किंवा दादांजवळ रुपया मागू नकोस हं. कोणत्याही युक्तीने आण—".

वसंताची घरची स्थिती फारशी चांगली नव्हती. दादासाहेब कोर्टात कारकून होते. अवघा एकशे चाळीस रुपये पगार होता त्यांना. घरात सदैव पैशाची चणचण व ओढाताण असे. एक रुपया मागून मिळणं वसंताला अशक्य होतं. त्यातून दादांचा धाक व रागीट स्वभाव. वसंतानं रुपया मागितला नाही, पण रुपयाचा मोह त्याला आवरेना. दुपारी दादा कोर्टात गेले. आई निजलेली होती. घरात फक्त वसंताच होता. त्याच्या मनात आले, ' दादांच्या कोटात एखादा रुपया असेल तर.......' आणि चटकन् त्याने कोटाच्या खिशात हात घातला. खिशात चार रुपयांच्या नोटा होत्या. कापऱ्या हाताने वसंताने एक नोट बाहेर काढली मात्र–

त्याने पुन्हा ती आत ठेवली. पुन्हा बाहेर काढली, पुन्हा ठेवली. शेवटी निश्चय करून त्याने नोट आपल्या खिशात टाकलीच; आणि तो बाहेर पडला.

सायंकाळी दादा घरी आले. त्यांनी खिशात हात घातला. एक रुपया कमी ! त्यांना आश्चर्य वाटले. चटकन् त्यांनी मालूला विचारले, वसंताला विचारले; पत्नीला विचारले. व शेवटी घरकामास ठेवलेल्या लहान दहा वर्षांच्या मुलासही विचारले. कुणीच कबूल करीना. दादांना राग आला. ते वसंताला म्हणाले, "वश्या खरं सांग नाहीतर तंगडं मोडीन, पाठ फोडीन ....' परंतु वसंताने खोटंच सांगितलं— "दादा मला खरंच माहीत नाही हो. मी नाही घेतली नोट—!" पण एवढे बोलतानाच तो कावरा बावरा झाला. खोटं बोलण्याची जाणीव त्याला असह्य झाली. पण—पाप केल्याची भावना त्याला टोचू लागली तरी पण तो तसाच आपल्या अभ्यासाच्या खोलीत गेला.


दादांना नोकर ठेवलेल्या मुलाचा संशय आला. त्यांनी त्याला खूप दरडावले— "कारट्या, घरातून बाहेर हाकून देईन. बोल नोट घेतलीस ना ? काय केलेस त्या रुपयाचे ? ......"

"दादा, नाही हो, मी गरीब आहे पण प्रामाणिक आहे. मला खरंच माहीत नाही नोट कुणी घेतली ते !" तोही रडू लागला.

वसंता आपल्या खोलीत आला. खोलीतच महात्माजींची—बापूजींची— एक लहानशी प्रतिमा होती. तिच्याकडे लक्ष जाताच वसंताला रडू कोसळले.

महात्माजींविषयी त्याला फारच आदर वाटे. त्यांचे जीवन-चरित्र—सत्याचे प्रयोग—त्याने वाचले होते. त्यांच्या 'सत्यावर' त्याचा विश्वास होता. प्रतिमेकडे पाहाताच वसंताला वाटले, प्रतिमेतील गांधीजी त्याला सांगत आहेत— "वसंता, रडू नकोस. तू चोरी केलीस पण तुला पश्चात्ताप झाला आहे. पश्चात्तापानं माणूस पवित्र होतो. चुकणं हा मनुष्याचा स्वभाव आहे. परंतु आपली झालेली चूक कबूल करणं

यात मोठेपणा आहे. जा, दादांना खरी हकीकत सांग--दादा क्षमा करतील तुला. .......”



महात्माजींच्या प्रतिमेकडे लक्ष जाताच वसंताला रडू कोसळले.

"बापूजी—!" अस्पष्ट शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडला. तो रडू लागला. त्याला धीर होईना—इतक्यात दादासाहेब खोलीत आले व प्रेमळपणे वसंताच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले "वसंता का रडतोस ? तू नोट चोरली नाहीस ना ? मग रडू नकोस ! उगा !—"

वडिलांच्या त्या प्रेमळ स्पर्शाने तो अधिकच रडू लागला व रडत रडत म्हणाला—"दादा ऽऽऽ मीच नोट चोरली." पुढे त्याला बोलवेना.

"काय म्हणतोस ? तू घेतलीस ? हात् वेड्या. मग आधीच खरं सांगितलं असतंस तर मी तुला रागावलो असतो का ? आणि तू जर रुपया मागितला असतास तर मी दिला नसता का तुला ? जाऊं दे ! तू खरं सांगितलंस याचाच मला आनंद आहे. असंच नेहमी खरं बोलण्यास शीक—" एवढेच म्हणून दादासाहेब निघून गेले.

वसंताला किती बरे वाटले. महात्माजींच्या त्या प्रेमळ व सस्मित मूर्तीकडे पाहून वसंताने भक्तिभावाने नमस्कार केला. "बापूजी तुम्हीच मला वाचविलं !" एवढंच तो पुटपुटला.

वसंताने आता जयंताची संगत सोडून दिली आणि तो पुन्हा पूर्ववत् चांगला झाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... ३३४ ... नोंद दि. ...

## २ : हरवलेली पुस्तके

त्या वेळी मी अमळनेर येथील एका लहानश्या शाळेत शिक्षक होतो. मी तिसरीच्या वर्गाचा वर्गशिक्षक असून माझ्याकडे मराठी हा विषय होता. हिंदी, इतिहास हे देखील विषय मी शिकवीत होतो. विद्यार्थीवर्गात मी फारच आवडता असे. माझ्या प्रेमळ, मनमिळाऊ व विनोदी स्वभावामुळे मी सर्वांचाच आवडता झालो होतो. शिक्षक-

बंधूंशी देखील मी मिळून मिसळून राहत असे व प्रेमाने वागत असे. सारे शिक्षक-बंधू माझ्याशी खेळीमेळीने राहात असत.

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक प्रगतीबरोबरच त्यांची शारीरिक, मानसिक, व सांस्कृतिक प्रगती व्हावी असे मला नेहमी वाटे व त्याप्रमाणेच मी खटपट देखील करीत असे. विद्यार्थ्यांच्या चारित्र्याबद्दल व शीलसंवर्धनाबद्दल देखील मी मनापासून काळजी घेत असे.

माझ्या वर्गाबद्दल मला फारच प्रेम वाटे, आदर वाटे व अभिमान वाटे. माझ्या वर्गात अनेक जातींचे, अनेक धर्मांचे व अनेक मतांचे व स्वभावांचे विद्यार्थी होते. काही अत्यंत चलाख, चपळ, मनमिळाऊ तर काही मठ्ठ, अडाणी, भोळसट व मूर्ख; काही प्रेमळ, विश्वासू व स्वाभिमानी, तर काही द्वेषी, मत्सरी, रागीट व अप्रामाणिक; काही अभ्यासी, चौकस, कर्तबगार व प्रामाणिक, तर काही धिम्मे, गंभीर, अविश्वासू व ढोंगी; काही सदैव हसरे व आनंदी तर काही सदैव रडके व दुःखी; काही धष्टपुष्ट, धीट, तर काही अशक्त, रोगट व भित्रे; काही चोर व काही साव—सारे प्रकार होते! जणू मानव जातीचे मूर्तिमंत चिमुकले प्रदर्शनच! नाना स्वभाव, नाना व्यक्ती!

माझ्या वर्गात नुकताच एक नवीन विद्यार्थी आला होता. त्याचे नाव मनोहर. फारच प्रेमळ, आनंदी व विनोदी स्वभावाचा होता तो. त्याने सारी पुस्तके नवीन घेतली होती. त्याने पुस्तकांवर नावे देखील घातलेली नव्हती. अगदी कोरी पुस्तके होती ती.

एके दिवशी मधल्या सुटीत तो आपले दप्तर वर्गात ठेऊनच बाहेर गेला. आणि मधल्या सुटीनंतर शाळेत येऊन पाहातो तो त्याचे दप्तरातील इंग्रजीचे व इतिहासाचे पुस्तक हरविलेले होते. त्याने मला सांगितले. मी मुलांना म्हटले, 'विद्यार्थी मित्रांनो, तुमच्या वर्गातील नवीन आलेल्या मुलाची, मनोहरची पुस्तके चोरीस गेली आहेत. तुमच्यापैकी कुणी घेतली असल्यास प्रामाणिकपणाने कबूल करून ती पुस्तके मजजवळ परत करा. चोरी करणे पाप आहे. तो एक मोठा सामाजिक गुन्हा आहे. या वयात

असल्या वाईट सवयी तुम्ही लावून घेतल्या तर पुढे समाजात मानाने राहाणे तुम्हांस अशक्य होईल. खरे बोलण्यास शिका. वाईट सवयींपासून, वाईट मैत्रीपासून अलिप्त रहा. घेतली असतील तर प्रेमाने व विश्वासाने पुस्तके मजजवळ परत करा. नाहीतर मला कडक उपाय योजावे लागतील.—"

मी त्या दिवशी मराठीचा तास मुलांना उपदेश करण्यातच घालविला. परंतु जगात प्रामाणिकपणा कुठे आहे? सत्य कुठे आहे? 'अप्रमाणिकपणा हाच प्रामाणिकपणा व असत्य हेच सत्य!'— आपल्या वर्गात चोरी व्हावी व चोराने गुन्हा कबूल करू नये. याबद्दल मला खूपच वाईट वाटले.

चोरी करणाऱ्या विद्यार्थ्याचा शोध लावून त्यास शीलाच्या पवित्र मार्गावर आणणे माझे कर्तव्यच होते. मी अनेक उपाय योजू लागलो.

दुसऱ्या दिवशी मराठीचाच तास होता. मी मुद्दाम मनोहरचेच पुस्तक शिकविण्यास घेतले. एका कवितेच्या धड्यावर मी एक बारीक खूण केली व सही केली व तो धडा शिकवू लागलो. मनोहरचे ते खूण केलेले पुस्तक मी त्यास परत केले.

मधली सुटी झाली मात्र आणि मनोहरचे मराठीचे पुस्तक देखील चोरीस गेले. हे पहाताच मला जरा आनंद व आश्चर्य वाटले. चोरास पहिली चोरी पचल्यामुळे त्याने मनोहरचे दुसरेही कोरे पुस्तक लांवविले होते. त्याचेवरही नाव वगैरे न टाकण्याबद्दल मीच मनोहरला खुणविले होते. आणि नेमके तेच पुस्तक हरवल्यानंतर मला हायसे वाटले. आता चोर सापडणार!

तिसरे दिवशी मराठीच्या तासाला कालचाच अपुरा धडा मी शिकविण्यास सुरुवात केली. तोच कवितेचा धडा होता. मी आज माझे पुस्तक घेतले होते. मध्यंतरी मुलांना धड्यावरील एक प्रश्न देऊन उत्तर लिहिण्यास सांगितले. वर्गातून फिरू लागलो. प्रत्येक मुलाचे पुस्तक मी मोठ्या उत्सुकतेने पाहू लागलो.

तो काय आश्चर्य! ज्या पुस्तकावर मी सही व खूण केली होती तेच पुस्तक एका मुलाच्या हातात मी पाहिले. मला आश्चर्य वाटले. मी त्या मुलास विचारले, " बाळ सुधाकर, हे पुस्तक कुणाचे रे ? आणि ही खूण कोणी रे केली ? ही तर माझीच सही आहे—कुणाचे आहे हे पुस्तक ?"



" कुणाचे आहे हे पुस्तक ? "

" मऽऽ म ऽ माझंच आहे, सर—" चाचरत चाचरत तो बोलू लागला.

" तुझेच आहे ना ? मग तुझे नाव नाही त्यावर ? आणि ही माझी सही केव्हा केली मी ? --" मी म्हणालो.

" सर ऽऽ त्याचं असं झालं ऽऽ......" तो अधिकच घाबरला. सारी मुले आश्चर्याने पाहू लागली.

" सुधाकर, घाबरू नकोस, खरे बोल. हे पुस्तक तुझे नाही ना ? हे त्या मनोहरच्या दप्तरातूनच तू घेतलेस ना ?"

" होय सर, पण सर ऽऽ... "

" नको, घाबरू नकोस, तुला मी मारणार नाही. यापुढे मात्र चोरी करू नकोस. वर्गाची माफी माग व वर्गापुढे शपथ घे की या पुढे मी खोटे बोलणार नाही. चोरी करणार नाही. "

पश्चात्तापाच्या अश्रूंनी त्याचे डोळे भरून आले होते. सुधाकरने वर्गापुढे शपथ घेतली; " मी यापुढे चोरी करणार नाही, खोटे बोलणार नाही. "

मनोहरचे मराठी पुस्तक त्याला मिळालेच; पण इतर पुस्तके देखील परत मिळाली. विद्यार्थ्यांना धडा मिळाला. मलाही सात्त्विक आनंद झाला. मी नवीन धडा शिकवू लागलो—

" चोरी आणि अप्रामाणिकपणा. "

क्रमांक......नोंद दि.

# ३ : स्मृती

आज भाऊबीज.

तो प्रसंग मला फिरून आठवला आणि डोळे पुन्हा अश्रूंनी भरून आले.

तो प्रसंग आठवला म्हणजे अजूनही मला वाईट वाटते व डोळे अश्रूंनी डबडबून येतात—

त्या वेळी मी जवळ जवळ बारा वर्षांचा असेन, इंग्रजी तिसऱ्या वर्गात मी शिकत होतो. घरची अत्यंत गरिबी होती. मूर्तिमंत दारिद्रय घरात नांदत होते. माझे वडील त्यावेळी जवळ जवळ चाळीस वर्षांचे असावेत. एका मराठी शाळेत चित्रकला विषयाचे शिक्षक होते ते. अवघा चाळीस रुपये पगार मिळत असे त्यांना; त्यातूनच घरखर्च, कपडालत्ता, आलागेला, सणवार, इत्यादी सारा खर्च चालविणे मोठे कठीण काम होते, परंतु माझे वडील मोठे खंबीर मनाचे व निश्चयी स्वभावाचे असल्यामुळे ते आलेल्या परिस्थितीला तोंड देऊ शकत होते. घरात आम्ही आठ दहा माणसे होतो. मी, माझे वडील, माझी आई, माझे काका, माझी मावस बहीण दुर्गा, व माझी धाकटी पाच भावंडे—घरात कमविणारे फक्त माझे वडीलच होते. ना घर ना दार, ना शेती ना वाडी, ना बाग ना बगीचा, ना देऊळ ना धर्मशाळा, अवघ्या चाळीस रुपड्यांवर सारा प्रपंच चालविणे माझ्या वडिलांच्या मोठे जिवावर येई. पण ते काय करणार !

जसा काळ येईल तसे वागण्यातच माणसाचे मोठेपण असते ना !

अवघ्या चाळीस रुपयांत सारा प्रपंच माझे वडील मोठ्या नेटाने व धिटाईने चालवीत होते. सुखात व आनंदात आमचे दिवस चालले होते पण काळाला कुणाचेच सुख बघवत नाही, हेच खरे—

दोन तीन वर्षे गेली नाहीत तोच माझे वडील एकाएकी आम्हांला सोडून स्वर्गलोकी गेले. मायेचे एक छत्र गेले, पंख तुटले गेले, प्रेमाचा आसरा गेला, पंख तुटलेल्या पाखराप्रमाणे आमची स्थिती झाली. आलेल्या कठिण परिस्थितीला कसेतरी तोंड देणे भागच होते. माझे शिक्षण अपुरे पडू नये म्हणून मी ते गाव सोडले व उमरावतीस येऊन राहू लागलो. आई व माझी धाकटी भावंडे तिथेच भुसावळ येथे होती, काकांनी नोकरी धरली, आई भांडी घासणे, धुणे धुणे, काबाडकष्ट करू लागली व प्रपंच चालवू लागली. दिवसामागून दिवस जाऊ लागले· काळाची पावले कधी थांबतात का ? ती सारखी पुढेच पडत असतात.

उमरावतीस येऊन मी शाळेत नाव दाखल केले. शाळेच्या वसतिगृहात राहू लागलो; माधुकरी मागून व वार लावून मी पोट भरू लागलो; शिक्षण करू लागलो. असेही काही दिवस गेले. दुःखात देखील आम्ही सुख मानीत होतो व धैर्याने दिवस काढीत होतो. पण--

एके दिवशी एक अचानक प्रकार घडला. उमरावतीस एक अत्यंत श्रीमंत जहागीरदार राहात असत. त्यांचे नाव 'अप्पासाहेब पटवर्धन. गावात ठिकठिकाणी त्यांची घरे, चाळी, धर्मशाळा, दुकाने व देवळे होती. गावाबाहेर बरीच शेती व मळेही होते. गडगंज संपत्तीत लोळत होते ते.

सुदैवाने म्हणा अगर दुर्दैवाने म्हणा त्यांच्या घरी मला एक वार लागला.... खूप आनंद झाला मला. श्रीमंतांच्या घरी जेवण मिळणे म्हणजे केवढी भाग्याची गोष्ट, असेच त्यावेळी मला वाटू लागले...पण ...गरिबांची मीठभाकरी बरी पण श्रीमंतांची लाडू पुरी नको ही गोष्ट थोड्याच दिवसात अनुभवाने मला कळून चुकली.

दिवाळीचे दिवस होते. भाऊबीजेचा दिवस. माझा वार जहागिरदारांकडे होता. पाकातील चिरोट्यांचे यथेष्ट जेवण केले मी. दक्षिणाही खूप मिळाली मला.आनंदाने जेवून मी घराकडे वळलो. रात्री पुन्हा गेलो मात्र, तोच काय आश्चर्य !

" चल चालता हो येथून ! तुझे तोंड देखील बघण्याची आमची इच्छा नाही ! गरीब म्हणवितोस, वार लावून जेवतोस, आणि श्रीमंतांच्या

घरी चोऱ्या करतोस काय ! लाज नाही वाटत तुला--?" मालकीणबाई एकदम माझ्या अंगावर खेकसून म्हणू लागल्या.

मला आश्चर्यच वाटले.

"काय झाले आईसाहेब ?-" मी आश्चर्याने व भीतीने विचारले.



" श्रीमंताच्या घरी चोऱ्या करतोस. लाज नाही वाटत तुला ? "

"काय झाले ! लाज नाही वाटत विचारायला वर तोंड करून. जसे काहीच ठाऊक नाही तुला काय ! थांब, आता पोलीस येतील

तेव्हाच तुला कळेल बरं काय झालं ते— " आईसाहेब चिडलेल्या होत्या माझ्यावर.

पण काय झाले होते हेच मला कळेना.

"काय झाले सांगा ना ! चोरी झाली काय ? " मी विचारले.

"आता कसं कळलं चोरी झाली म्हणून ? आज दुपारी माझ्या फडताळातली हिऱ्याची आंगठी चोरीस गेली, ठाऊक नाही तुला! चोरच्या चोर आणि शिरजोर ! थांब मेल्या ! येऊ देत पोलीस म्हणजे काढते तुझी एकेक कुलंगडी. बोल, बऱ्या बोलाने आंगठी आणतोस का जातोस तुरुंगात–"

"पण आईसाहेब मी आंगठी चोरली नाही, जेवण झाल्यावर मी थेट घरी गेलो–"

"साफ खोटं ! जेवण झाल्यावर तू फडताळ उघडले नाहीस ?"

"हो उघडले ! पण ते आंगठीसाठी नाही–तिथे मी माझा कद ठेवण्याची पिशवी ठेवली होती. ती घेतली व मी कपडे घालून सरळ घरी गेलो. नंतर काय झाले ते मला ठाऊकच नाही."

"कपाटात आंगठी नव्हती ? " आईंनी दरडावून विचारले.

"असेल ! पण माझं लक्ष नव्हतं आईसाहेब " मी म्हणालो.

"लक्ष नव्हतं काय–" आईसाहेब म्हणाल्या.

घरातील आंगठी चोरीस गेली होती व त्यांनी माझ्यावर आळ घेतला होता कारण मी गरीब होतो. खरेच गरिबी हा गुन्हा आहे, पाप आहे, हेच खरे. आंगठी न चोरता माझ्यावर खोटा आळ घेण्यात आला होता.

" आईसाहेब मला पोलीसच्या तावडीत देऊन माझी अब्रू घालवू नका. मी गरीब आहे पण प्रामाणिक आहे हो. गरिबी हा माझा गुन्हा असेल, पाप असेल पण मी चोर नाही, आंगठी मी घेतली नाही, विश्वास ठेवा माझ्या बोलण्यावर. " मला पोलीसच्या तावडीत देऊन माझी व माझ्या घराण्याची किंमत काढू नका; लाज ठेवा आम्हां गरिबांची. मी गरीब आहे पण चोर नाही हो ? मी खरोखर आंगठी चोरली नाही,

लागल्यास आंगठीची किंमत मी भरून देईन पण माझी अब्रू जाऊ देऊ नका— मी गयावया करून सांगू लागलो. माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या.

पण गरिबांच्या अश्रूंची जगात कोण पर्वा करतो ! आईसाहेबांनी ऐकले नाही. त्यांनी मला पोलीसच्या ताब्यात दिले. अप्पासाहेबांनी व त्यांच्या मुलाबाळांनी कुणीच विरोध केला नाही.

पोलीसांनी मला दोन दिवस नजर कैदेत ठेवले. तिसऱ्या दिवशी सकाळी चावडीवर अप्पासाहेबांची मोलकरीण ‘ रखमा ’ आलेली पाहताच मला आश्चर्य वाटले.

रखमा फौजदारांजवळ जाऊन म्हणाली, “ साहेब, ह्या गरीब ब्राह्मणाच्या मुलाला सोडून द्या. त्याने आंगठी चोरली नाही ; मीच ती आंगठी चोरली होती.मला पश्चात्ताप झाला तो याचे दुःख पाहून. माझ्या गुन्ह्यामुळे या गरीबास शिक्षा. मला क्षमा करा व याला सोडून द्या. हा मुलगा निरपराध आहे. मला पकडा, मीच गुन्हेगार आहे ! ––”

अखेर एका गरीबानेच गरीबाचे अंत:करण ओळखले. अश्रूंची पर्वा केली.

माझी सुटका झाली. व खरे सांगितल्याबद्दल रखमाची देखील अधिकाऱ्यांनी सुटका केली.

वरील प्रसंग घडून आज जवळ जवळ पंचवीस वर्षे झाली––पण आज भाऊबीज असल्यामुळे तो प्रसंग मला फिरून आठवला व माझे डोळे पुन्हा अश्रूंनी भरून आले.

आज अप्पासाहेब जिवंत नाहीत, आईसाहेब जिवंत नाहीत व रखमा देखील नाही. परंतु त्यांची स्मृती माझ्या हृदयपटावर कोरलेली आहे.

क्रमांक ...3329...... नोंद दि...

# ४ : पश्चात्ताप

आणि त्या दिवशी बाळला मी खूप खूप मारलं. परंतु चूक माझी होती. बाळची नव्हती. दोष माझा होता. बाळचा नव्हता. परंतु माणूस आपली चूक दुसऱ्यावर विनाकारण लादतो हेच खरं आणि त्या दिवशी असंच झालं.

मी आणि बाळ आम्ही दोघं घराच्या मागील लहानशा बागेत चेंडू खेळत होतो. माझे इतर काही मित्र देखील खेळण्यात सामील होतेच. बाळ माझा धाकटा भाऊ. अवघा आठ वर्षांचा होता आणि मी होतो पंधरा वर्षांचा.

सायंकाळची रम्य आणि पवित्र वेळ होती. खेळ अगदी रंगात आलेला होता. मध्येच काही कामासाठी आईनं मला घरात बोलाविलं. घाईघाईने मी घरात गेलो. चेंडू फेकण्याची माझीच पाळी होती, आणि चेंडू हातात घेऊनच मी घरात ताबडतोब गेलो.

राम माझा मित्र. त्याचे जवळही एक चेंडू होता. तो काढून तो व बाळ खेळू लागले. खेळ चालूच होता.

मी घरात आलो, आणि घाईघाईने मी माझ्याच हातानं चेंडू माळ्यावर फेकून दिला. बराच वेळ कामात मोडल्यानंतर मी बाहेर आलो तो बाळचा खेळ केव्हाच संपला होता.

दुसरा दिवस उजाडला. सायंकाळी सहा वाजण्याचा सुमार होता. चेंडू खेळण्याची वेळ झाली.

मी इकडं तिकडं पाहिलं, पण चेंडूचा पत्ता नव्हता. खूप शोधला मी चेंडू. पण सापडेना. मी बाळास हाक मारली.

"बाळचा–काल तुम्ही चेंडू खेळत होता ना? कुठं आहे माझा चेंडू? हरवलास ना गद्धया!"

मी बाळला खूप खूप टाकून बोललो.

दीनवाणे बाळ सांगत होता—

" दादा, तू जाताना घरात चेंडूही नेला होतास की, मी रामचा चेंडू खेळत होतो. तुझा चेंडू मला मुळीच माहीत नाही. "



" तुझा चेंडू मला मुळीच माहीत नाही," बाळ म्हणाला

" गाढवा, खोटे बोलतोस काय? तूच माझा चेंडू हरवलास. कुठे टाकलास सांग, नाही तर–" आणि मी बाळाला खूप खूप मारले. बाळच्या

[library stamp, illegible]

डोळयात आसवं चमकत होती. त्याला मी खूप टाकून बोललो. पण त्या गोष्टीचा आज मला पश्चात्ताप होत आहे. कारण--

रात्री लाकडे काढण्यासाठी आई माळयावर चढली. त्या वेळीच धपकन् चेंडू खाली पडला. बाळ उठला आणि म्हणाला, "पाहिलंस, दादा, हा पहा तुझा चेंडू माळयावर टाकला होता कुणीतरी—"

मला चेंडू दिसताच वाईट वाटले. मनात आलं 'आज आपण बाळला विनाकारण मारलं. चूक माझी होती. दोष माझा होता. खरंच आपली भांडणं ही अशीच या नाही त्या अशा किरकोळ कारणांवरून होत असतात. परंतु आपण आपलीच बाजू खरी असं समजतो. दुसऱ्याची बाजू आपण कधीच लक्षात घेत नाही. दोन्ही बाजू खऱ्या असण्याची शक्यता असते. आपण आपली चूक लक्षात न घेता ती दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करतो. पण ज्यावेळी आपली चूक आपल्या लक्षात येते त्यावेळी मात्र पश्चात्ताप होतो. आणि पश्चात्तापानेच माणूस पवित्र होतो हेच खरे.

माझंही तसंच झालं. माझी चूक माझ्या लक्षात आली मात्र आणि डोळयांतून अश्रुधारा वाहू लागल्या. मला पूर्ण पश्चात्ताप झाला होता.

बाळला मी हाक मारली आणि सांगितलं "बाळ हा चेंडू मी तुलाच बक्षीस देत आहे. जा" आणि आनंदानं दुडदुड धावतच बाळ घरात गेला. त्याच्या धावत्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून मी मनात म्हटलं— "अहाहा ! किती निष्पाप बालक" आणि यापुढे माझ्या प्रिय बाळशी कधीही भांडावयाचे नाही, असा मी निश्चय केला.

... वाचनालय शाखा.
अनुक्रम ... दि ...
क्रमांक ... नोंद दि ...

# ५ : माधवची परीक्षा

माधव सहावीच्या वर्गात शिकत होता. तो हुषार, चौकस, धीट व चपळ विद्यार्थी होता; वर्गात त्याचाच बहुधा पहिला नंबर असे. शाळेतील कोणत्याही कार्यात माधवचा पुढाकार असे. वादविवाद सभा, नाटच-संमेलन, खेळ या सर्वात माधवला अनेक बक्षिसे देखील मिळालेली होती. तो एक आदर्श विद्यार्थी होता. प्रेमळ, कष्टाळू व आनंदी स्वभावाचा. सर्व शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा देखील माधववर फार लोभ होता.

माधवच्या वडिलांना–नानासाहेबांना देखील मुलाचा फार अभिमान वाटे. शाळेतील सर्व शिक्षक त्याची स्तुतीच करीत असत. एक आदर्श व गुणवान विद्यार्थी म्हणूनच त्याला ओळखत असत. परंतु इतके असूनही त्याच्यात एक दुर्गुण होताच. तो म्हणजे त्याचा आळस.

माधव अत्यंत आळशी होता. शाळेचे कोणतेही काम जरी तो नीटनेटके करी तरी वेळेवर कधीच करीत नसे. शाळेत तो नेहमी दहा मिनिटे उशिराच जाई; सकाळी उशिराच उठे, कोणतेही कार्य त्याने वेळेवर कधीच केले नाही. याला कारण त्याचा आळस होय. पण त्याचा परिणाम त्याला भोगावाच लागला.

शाळेची वार्षिक परीक्षा जवळ आलेली होती––

माधवचे वर्गशिक्षक त्याला म्हणाले, " माधव उद्यापासून परीक्षा सुरू आहे. सकाळी लवकर ऊठ. आळस करू नकोस. नाहीतर फुकट पेपर बुडविशील व नापास होशील; आळस सोड. सकाळी लवकरच ऊठ व शाळेत वेळेवर ये !–"

सकाळी लवकर उठण्यासाठी माधवने आपल्या आईस देखील सांगितले की, " आई, मला सकाळी पाच वाजता उठव. गजर देखील लाव–"

"बरं आहे—" आई म्हणाली.

किर्रर्र ऽऽ...... गजर वाजू लागला. आई धावत आली व म्हणाली " माधव ऊठ. सकाळ होईलच आता; गजर बंद कर व तोंड धुवून ये. अभ्यासास लाग. "



......माधवराव निद्रादेवीच्या उपासनेत गर्क.

माधवला उठणे जिवावर आले होते. डोळे चोळीतच तो कसाबसा उठला, त्याने गजर बंद केला, व मनात म्हणाला– " अजून दीड तास अवकाश आहे, इतक्या लवकर उठून काय करावयाचे ? निजू थोडा वेळ, उठू पुन्हा,—"

माधव पुन्हा झोपला. आई कामास लागली होती.

तिला वाटले माधव उठून अभ्यास करीत बसला असेल. कामाच्या नादात तिचे त्याच्याकडे लक्ष नव्हते.

इकडे माधव मात्र गाढ झोपला होता. साडेसातचा ठोका पडला. आईला एकदम आठवण झाली. माधव अजून कसा अभ्यास आटोपून

आला नाही. तिकडे शाळा तर साडेसातलाच सुरू झाली. आईला वाटले. कदाचित परीक्षा म्हणून तोंड वगैरे धुऊन तो तसाच परीक्षेला गेला असेल. तरी पण सहज पहावे म्हणून ती माधवच्या खोलीत डोकावली. तर काय माधवराव निद्रादेवीच्या उपासनेत गर्क.

आईने जोरात हाका मारून त्याला उठविले. साडेसात वाजलेले पाहाताच माधवरावांची तिरपीट उडाली. शाई, पेपर कसे बसे घेऊन तोंड न धुता नुसती चूळ भरून स्वारी शाळेत पळत पळत गेली. तो आठ वाजून गेलेले. परीक्षा केव्हाच सुरू झालेली. त्याला एक तास उशीर झाला. पेपर लिहिण्यास त्याला परवानगी मिळाली नाही.

बिचारा माधव हुशार असूनही केवळ आळसामुळे तो वार्षिक परीक्षेत नापास झाला !

## ६ : संगतीचा परिणाम

मधू आणि विनू हे दोघेही वयाने सारखेच म्हणजे आठ नऊ वर्षांचे होते. दोघेही एकाच वर्गात–मराठी तिसरीत–शिकत होते. दोघेही दिसावयास सारखेच होते. दोघेही शेजारी शेजारीच राहात होते. दोघांचेही वडील एकाच खात्यात नोकरीस होते. पण दोघांचे स्वभाव मात्र फार निराळे होते.

मधू जात्या हुषार होता. तो अभ्यासू होता. खेळकर होता. सदा हसतमुखी आणि आनंदी होता. कुणाच्याही घेण्यात नाही नी देण्यात नाही.

विनू मात्र उनाड होता. याची खोडी कर, त्याची खोडी कर, याची टोपी लपव, त्याचे केस ओढ, याचे पेन लांवव, त्याचा कोट फाड; एक ना दोन, किती तरी खोड्या करी. तसाच तो चोरटाही होता. वर्गात रोज कुणाचे काही ना काही चोरीस जाईच. परंतु चोर कुणाला सापडला नाही.

विनू कसा आहे हे आजूबाजूच्या सर्व लोकांना माहीत होते. त्याची संगत आपल्या मुलांना नको म्हणून सगळे आईबाप जपत. मधूच्याही आईवडिलांनी मधूला विनूची संगत सोडून देण्यास सांगितले; पण ते मधूला आवडले नाही. तो सारखा विनूबरोबर असे.

दिवसेंदिवस मधूची आणि विनूची संगत वाढतच चालली. वर्ग-शिक्षकांनीही मधूस सांगितले–"मधू तू हुषार आहेस, तू विनूसारख्या उनाड मुलाच्या संगतीत राहू नकोस." पण मधूने ते ऐकले नाही आणि त्याचा परिणाम मधूस भोगावा लागला.

काय झाले?

त्या दिवशी गुरुवार होता. शाळेची मधली सुट्टी झाली होती. सारी मुले आपापल्या घरी गेली होती. थोड्या वेळाने सारी मुले परत आली. वर्ग सुरू झाला. शिक्षकांनी मराठीचे पुस्तक काढावयास सांगितले. सर्वांनी पुस्तके काढली; परंतु शरदने अद्याप पुस्तक काढले नव्हते. त्याचा चेहरा कावराबावरा झाला होता.तो सारखा पिशवीत हात घालून काहीतरी शोधत होता.

शिक्षकांनी म्हटले, "शरद पुस्तक काढ लवकर आणि हे काय? तुझा चेहरा का असा रडवेला झालाय?"

"गुरुजी, माझ्या पिशवीतील पैशाचे पाकीट चोरीस गेलेले दिसते. सुट्टीत घरी नेण्याचे मी विसरलो. ते या पुस्तकांच्या पिशवीतच होते. पण आता मात्र नाही. कुणीतरी नक्की ते का ून घेतले असले पाहिजे," शरद म्हणाला.

गुरुजी सर्वांना म्हणाले, "मुलांनो, ज्याने पाकीट घेतले असेल त्याने मुकाट्याने टेबलावर आणून ठेवावे, नाहीतर मी प्रत्येकाची झडती घेईन."



मधूच्या पिशवीत पैशाचे पाकीट सापडले.

बराच वेळ झाला. पाकीट घेतल्याचे कुणीही कबूल करीना. गुरुजी संतापले. त्यांनी सर्वांची झडती घेण्याचे ठरविले, व त्याप्रमाणे गुरुजी एकेकाची पिशवी, खिसे, पहात चालले. गुरुजी विनूजवळ आले. ते विनूला म्हणाले, "काय विनोबा, काय म्हणतेय तुमची पिशवी ?" विनूच्या स्वभावावरून, वागण्यावरून पाकीट त्यानेच घेतले असेल व ते त्याच्या जवळ सापडेल असे गुरुजींना वाटत होते. परंतु विनूच्या पिशवीत काहीच निघाले नाही. विनूचे खिसेही तपासून झाले. विनूच्या शेजारीच मधू बसला होता. आता मधूची पाळी आली. गुरुजींनी मधूची पिशवी पाहिली. तो काय आश्चर्य ! मधूच्या पिशवीत पैशाचे पाकीट सापडले. मधूस त्याचे फार आश्चर्य वाटले. आपण पाकीट घेतले नसताना ते आपल्या पिशवीत कसे आले ? गुरुजींनी त्यास चोर ठरविले व खूप मारले. चोरी न करता मधूस शिक्षा झाली. मधूला शिक्षा होत असताना, मार बसत असताना सर्व मुले घाबरून गेली. पण विनू मात्र सारखा गालातल्या गालात हसत होता. त्याला आनंदाच्या उकळ्या फुटल्या, कारण चोरी त्यानेच केली होती आणि गुरुजी झडती घेतात असे पाहून त्यांना, मधूला आणि कोणालाच नकळत त्याने ते पाकीट हळूच मधूच्या पिशवीत सरकवून दिले.

विनू हसत असलेला जेव्हा गुरुजींना दिसला तेव्हा त्यानेच पाकीट लांबवले असले पाहिजे असा गुरुजींना संशय आला व त्यांनी चांगलेच खडसावून विनूला पुन्हा विचारले व मारण्यासाठी छडी सरसावली. तेव्हा विनूने मुकाट्याने पाकीट चोरल्याचे कबूल केले. गुरुजींनी त्यालाही चोपून काढले.

चोरी केलेली नसतानाही केवळ वाईट संगतीमुळे आपल्या मुलाला शिक्षा झाली ही गोष्ट मधूच्या वडिलांना कळली. त्यांनी मधूला विनूच्या संगतीचा परिणाम कसा झाला, त्याने कसे फसविले ते नीट समजावून सांगितले.

आता मधूला विनूचा स्वभाव चांगला कळला. त्याने विनूची संगत सोडून दिली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रमांक ८.१५७८... दि. ...
क्रमांक....३३२९.....नोंद दि. २७/१०/...

७ : 

# दिनू खरे बोलू लागला


दिनू आणि सदू दोघेही एकाच वर्गात होते. इंग्रजी दुसऱ्या इयत्तेत ते शिकत होते. दोघेही एकाच बाकावर शेजारी शेजारी बसत असत. दोघांचा स्वभावही बराचसा एकसारखा होता. अत्यंत मायाळू, विनोदी व प्रेमळ परंतु दोघांच्या अभ्यासात जमीन अस्मानाचा फरक होता. दिनू वर्गात नेहमी पहिला असे तर सदू नेहमी खाली असे. परंतु दोघेही जिवलग होते.

दिनू अभ्यासात नेहमी पुढे असे. वादविवाद-सभेत, हस्ताक्षर चढाओढीत, चित्रकलेच्या परीक्षेत. नाट्य–संवाद चढाओढीत, सगळी-कडे तो बहुतेक पहिला येई. वर्गातील कोणत्याही सामाजिक कार्यात तसेच शालेय जीवनातील कोणत्याही कार्यात दिनू पुढे असे. सर्व शिक्षकांचे त्याच्यावर निरतिशय प्रेम होते. सर्वत्र तो चमकत असे. परंतु इतके गुण असूनही त्याला एक वाईट सवय लागलेली होती. तो नेहमीच खोटे बोलत असे. एवढाच त्याच्या अंगी एक दुर्गुण होता. खोटे बोलण्याची सवय टाकून देण्याबद्दल त्याचे आई-वडील आणि वर्गशिक्षक यांनी अनेक वेळा त्याला सांगितले असेल; पण त्याने ते मनावर घेतले नाही, आणि त्याचा परिणाम त्याला भोगावा लागला. सदू जरी शालेय कार्यात, सामाजिक कार्यात व वर्गातील अभ्यासात नेहमी मागे होता, तरी तो सालस होता. सद्‌गुणी होता. तो नेहमी खरे बोलत असे.

शाळेची वार्षिक परीक्षा सुरू झाली. परीक्षेचा पहिलाच दिवस उजाडला. पहिलाच पेपर इंग्लिशचा होता. दिनूची पूर्ण तयारी झालेली होती. सदूची मात्र तितकी तयारी नव्हती. वर्गशिक्षकांनी सदूस बजावून ठेवले होते की, "सदू, लक्षांत ठेव. जर का इंग्रजी विषयात नापास झालास तर नापास होशील. पुढल्या वर्षी याच वर्गात बसावे लागेल." सदूला धाक बसला.

पेपर सुरू झाला. शिक्षकांचे वाचनात लक्ष होते. इतर मुले पेपर लिहिण्यात गर्क होती. पेपर पाहाताच सदूच्या तोंडचे पाणीच पळाले.

कारण, इंग्रजी विषयाचीच त्याला जास्त भीती होती. तो निराश झाला. त्याच्या डोळ्यांत अश्रू चमकू लागले. दिनूने ते पाहिले. त्याने क्षणभर विचार केला; आणखी एक पेपर घेतला. त्यात सदूसाठी चार प्रश्न सोडविले. स्वतःचे सहाही प्रश्न सोडविले व घंटा होताचा सदूचा पेपर घेतला, आपला घेतला व शिक्षकांना दिला. मात्र सदूचा म्हणून जो पेपर दिला तो त्याने स्वतः लिहिलेला होता !



शाळेची वार्षिक परीक्षा सुरू झाली.

सर्व पेपर संपले. पंधरा दिवसांनी निकाल लागला, आणि सदूस आश्चर्य वाटले. कारण तो उत्तीर्ण झाला होता व त्याला इंग्रजीत शंभरापैकी साठ गुण मिळाले होते. सदूला इतके गुण कसे मिळाले याचे वर्गशिक्षकांनाही आश्चर्य वाटले. ते म्हणाले देखील— " सदूने अखेरीस यश गाठले; परंतु मला अशी शंका येते की सदूस दिनूने पेपर लिहून दिला असावा. दिनूचे व सदूचे अक्षरांत फार फरक आहे. पण पेपरातील अक्षर सदूचे न दिसता दिनूच्या अक्षरासारखेच दिसते ! "

परंतु दिनूने ते कबूल केले नाही. तो म्हणाला– " सर, मी कशाला त्याला पेपर लिहून देऊ? आणि ते माझे अक्षर मुळीच नाही. " शिक्षकांना आश्चर्य वाटले ! दिनू चित्रासारखा तटस्थ उभा होता.

अखेर सदूच म्हणाला, " सर हे अक्षर माझे नव्हे व मी पास होण्यासारखा पेपर पण लिहिला नव्हता. अशा रीतीने यश मिळवून पुढच्या वर्गात बसण्यात मला भूषण नाही "

यावर शिक्षक म्हणाले, " शाबास ! सदू तू जरी हुषार नसलास तरी सद्‌गुणी आहेस. या तुझ्या सद्‌गुणासाठीच मी तुला वरच्या वर्गात घेण्याची शिफारस करतो. "

दिनूच्या डोळयांत आसवे चमकू लागली. तो हलकेच म्हणाला, " सर माफ करा मला. मी तुम्हांला फसविले, मी खोटे बोललो. मीच तो पेपर लिहिला व सदूला न कळत तुम्हांला तो आणून दिला. मला क्षमा करा. "

" बरं आहे दिनू, मी तुला या वेळेस क्षमा करीत आहे. मात्र लक्षात ठेव की या एका दुर्गुणामुळे तुझे इतर सर्व गुण मातीमोल होत आहेत. विचार कर. " दिनूने खाली मान घातली.

पण तेव्हापासून दिनूने तो दुर्गुण दूर करण्याचा नेटाने प्रयत्न केला. आणि आता तो खरे बोलू लागला आहे.

## ८ : वर्गबंधू

वामन केशवचा अत्यंत द्वेष करीत असे. केशवचा स्वभाव, त्याची वर्गात होणारी स्तुती, सर्वत्र होणारा गौरव व थोरपणा त्याला सहन होईना. वामन आणि केशव दोघेही एकाच वर्गात म्हणजे सातवीत शिकत होते. वयाने दोघेही सारखेच असून शेजारी शेजारी रहात असत. पण, वामन खूप श्रीमंत होता व केशव मात्र गरीब होता.

केशव हा स्वभावाने सालस, प्रेमळ, आनंदी वृत्तीचा,चौकस, चपळ व कुशाग्र बुद्धीचा होता, तर वामन त्याच्या उलट हट्टी, खुनशी, ढोंगी, अप्रामाणिक व अल्प बुद्धीचा होता. अर्थात वर्गात नेहमीच केशवचा क्रमांक वर असे, तर वामनचा जवळ जवळ शेवटीच असे. केशवचा क्रमांक अभ्यासाशिवाय शाळेच्या इतर कोणत्याही कार्यक्रमात, चढाओढीत आघाडीवर असे. त्याच्यावर सारे शिक्षक खुश असत. आदर्श विद्यार्थी म्हणून केशवची स्तुती व गौरव होत असे. असा तो सर्वांचा आवडता होता.

वामन मात्र सर्वत्र मागे पडत असे. त्याचा कुठेच वर क्रमांक नसे, त्याची कुणी स्तुती करीत नसे. त्याला कुणीच प्रेमाने व आदराने वागवीत नसे. त्याची सर्वजण चेष्टा करीत असत. त्याच्या हट्टी, खुनशी, शंकेखोर स्वभावामुळे कुणालाच तो आवडत नसे. आणि म्हणून तो सर्वांचा द्वेष करी. केशवचा तर तो फारच द्वेष करीत असे.

केशवच्या चुगल्या इतरांना सांगणे, त्याच्या गरिबीची सर्वत्र चेष्टा करणे, त्याला चिडविणे इत्यादी अनेक वाईट गोष्टी करण्यातच तो शाळेतील वेळ घालवीत असे.

एकदा शाळेची कुठेतरी सहल निघाली होती. सहलीसाठी इतर मुलांबरोबर वामन व केशवही गेले होते. गप्पा मारणे, विनोद-चेष्टा करणे, टिंगल करणे, पत्ते खेळणे, नकला करणे, इत्यादी अनेक कार्यक्रम झाल्यावर पोहोण्याचा कार्यक्रम ठरला. सारी मुले शिक्षकांना विचारून जवळच्याच तलावावर पोहोण्यास गेली. वामन व केशवही गेले.

पोहोण्याचा कार्यक्रम सुरू झाला. केशवला उत्तम पोहोता येत असे. वामनला मात्र जेमतेम पोहोता येई. परंतु सर्व मुलांनी भराभर उड्या टाकल्यामुळे आपला कमीपणा दिसू नये म्हणून त्यानेही उडी टाकली. पण——

तलावाचे पाणी बरेच खोल होते आणि ते संथ व गाऽऽर होते. वामन, केशव व इतर मुले पोहू लागली. पोहोण्याची शर्यत लागली. भराभर इतर मुले पुढे जाऊ लागली. पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागली. वामन पण पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागला. बराच वेळ गेल्यानंतर

९२३९०



त्याचा दम संपला. व हातपाय थकले. थोडयाच वेळात त्याचा सर्व दम छाटला गेला, हातपाय लुळे पडले व तो खाली खाली बुडू लागला.

केशव जवळच होता. वामनला चांगले पोहता येत नाही हे त्याला पूर्ण माहीत होते. म्हणून तो पुढे न जाता सारखा त्याच्या जवळ जवळ होता. वामनचा दम छाटला गेला व तो "बुडालो बुडालो, मेलो,



'बुडालो, मेलो, वाचवा' असे वामन ओरडू लागला.

मेलो, वाचवा" असे ओरडू लागला. ते ऐकून केशव त्याच्याजवळ गेला. त्याने खाली बुडी मारून वामनला वर काढले. हलकेच काठावर आणून सोडले. केशवने त्याचे प्राण वाचविले.

आणि चटकन् वामनचे डोळे पाण्याने भरून आले. आत्यंतिक पश्चात्तापामुळे त्याचा आवाज बदलला गेला. "केशव, मला क्षमा कर" एवढेच तो म्हणाला. केशवने त्याच्याजवळ जाऊन त्याचे डोळे पुसले व त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हटले, "वेडा कुठला, क्षमा कसली मागतोस त्यात. दुसऱ्याला संकटातून सोडविणे हेच माणसाचे खरे कर्तव्य होय तेच मी केले. यात मी मोठे असे काय केले ? तू माझा वर्गबंधू, शेजारी आणि मित्र आहेस ना ? मग काय तर !"

आणि त्या दिवसापासून वामनने केशवचा द्वेष करण्याचे सोडून दिले.

वाचनालय शाखा.
क्रमांक ३३२७ ... नोंद दि.
IRBK-0111390

# आमचे बालवाङ्मय

| | रु. प. |
|---|---|
| * मला वाटते | १–४० |
| * उत्कल प्रसंग | १–५० |
| * छोटयांची मोठी साहसे | १–०० |
| * इच्छानगरी ( नाटक ) | १–०० |
| * भारतीय सण व उत्सव | ६–०० |
| * बोलके कुत्रे आणि इतर गोष्टी | ०–७५ |
| * राजपूत असे लढले, भाग २ : प्रत्येकी | ०–८० |
| * हिमालयासम आमुचे वीर, भाग १ ते ३ : किंमत प्रत्येकी | ०–८० |
| * थोरांच्या नवलकथा भाग १ ते ६ : किंमत प्रत्येकी | ०–७५ |
| * इतिहासातील नवलकथा | ०–७५ |
| * ससेभाऊंच्या गमतीजमती | ०–५० |
| * कावळोबांच्या जमती | ०–९० |
| * माकडभाऊंच्या गमतीजमती | ०–६० |
| * गाढवभाऊंच्या गमतीजमती | ०–६० |
| * उंदिरमामांची कहाणी | ०–७५ |
| * आपण सारे एक | ०–७५ |
| * नामदेवाची दिवाळी | ०–३७ |
| * भेंड्या व अक्षर बापूजी | ०–६० |
| * वन्य पशूंच्या मौजा | ०–५० |
| * भारताच्या इतिहासातील मनोरंजक कथा | ०–५० |
| * संवाद-सुमने | ०–८० |
| * महर्षि कर्वे चरित्र | ०–५० |
| * गोष्टीच गोष्टी, भाग १ ते १० } प्रत्येकी | ०–६० |
| * सोनपंखी | २–३० |
| * मुलांचे रवींद्रनाथ | १–५० |

याशिवाय आणखी पुस्तके तयार होत आहेत. माहितीपत्रक मागवा.

अ. वि. गृह प्रकाशन, पुणें २.